**नुकसान :** तुरीवरील शेंगा पोखरणारी अळीनंतर शेंगमाशी पिकाचे सर्वात जास्त नुकसान करते. शेंगमाशीची एक अळी शेंगेच्या आत राहून एका दाण्यावर उपजीविका पूर्ण करते. अळी शेंगातील दाणे अर्धवट कुरतडून खात असल्यामुळे दाण्यांची मुकनी होते.

**शेंगमाशेची व्यवस्थापन :** तुरीवरील शेंगमाशीच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफास २५% ईसी २० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८% ईसी १० मिली, इंडोक्झाकार्ब १५.८% इसी ७ मिली लॅमडा सायहॅलोथ्रीन ५% ईसी १० मिली किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ एस एल ११ मिली दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## तुरीवरील महत्त्वाचे रोग

**१. मर रोग :** हा रोग फ्युजारीयम उडम या जमिनीत वास्तव करणाऱ्या बुरशीमुळे होतो. पानाच्या शिरा पिवळ्या होतात व पाने पिवळी पडतात. झाडाचे शेंडे मलुल होतात व कोमेजतात. झाड हिरव्या स्थितीत वाळते. जमिनीलगतच्या खोडाचा भाग काळ्या रंगाचा बनतो. मूळ उभे चिरले असता मुळाच्या मध्यभागा हा काळा दिसतो यात बुरशीची वाढ झालेली दिसते. कधीकधी खोडावर पांढरी बुरशी सुद्धा आढळते.



**व्यवस्थापन:** पिकाची दीर्घकालीन फेरफलट अवलंबाववी रोगप्रतिबंधक जाती पेराव्यात उदा. गोदावरी, बीडिएन ७१६, आयसीपीएल ८७११९, बीएसएमआर ८५३ व पीकेव्ही तारा इत्यादी पेरणीपूर्वी मिश्र बुरशीनाशक कार्बोक्सीन ३७.५% + थायरम ३७.५% तीन ग्रॅम प्रति किलो तसेच ट्रायकोडर्मा चार ग्रॅम प्रति किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी.

**२. वांझ रोग :** हा विषाणूजन्य रोग असून झाड झुडपासारखे वाढते व पानांचा रंग फिकट हिरवा दिसतो. पानावर पिवळे गोलाकार ठिपके दिसतात. झाडावर अत्यंत कमी किंवा मुळीच शेंगधारणा होत नाही. या रोगाचा प्रसार इरीयोफाईड कोळ्यामुळे होतो.



**व्यवस्थापन:** बीएसएम आर ७ ३ ६ , बीएसएम आर ८५३, आशा किंवा पिकेव्हि तारा या वानाची लागवड करावी. मारुती हा वाण या रोगाला मोठ्या प्रमाणात बळी पडतो. कोळीनाशकांद्वारे कोळ्याचे व्यवस्थापण करावे.

## ३. खोडावरील करपा :

**कोलेटोट्रायकम करपा :** हा रोग कोलेटोट्रायकम डिमॅशीअम या बुरशीमुळे होतो. खोडावर फांद्यावर काळ्या करड्या रंगाची चट्टे पडतात. रोगाची तीव्रता अधिक असल्यास फांद्या व झाडे वाळतात.

**व्यवस्थापन :** प्रतिबंधक उपाय म्हणून रोगट फांद्या व झाडे जाळून नष्ट करावीत.

**फाइटोप्थेरा करपा :** हा रोग फाइटोप्थेरा ड्रेसलेरा या बुरशीमुळे होतो. या रोगामुळे पानावर ओलसर चट्टे तसेच खोडावर तपकिरी गर्द वा तपकिरी चट्टे जमिनीलगत किंवा जमिनीपासून काही इंच अंतरावर आढळतात. नंतर हे चट्टे वाढत जातात व खोडा सभोवती खोलगट भाग तयार करून खोडावर गाठी तयार करतात. पाण्यातून व हवेद्वारे या रोगाच्या बिजाणूंचा प्रसार होतो.

**व्यवस्थापन :** रोगग्रस्त शेतात तसेच पाणी साचणाऱ्या जमिनीत पीक घेऊ नये व रोगट अवशेष जाळून नष्ट करावे.

घडीपत्रिका क्र: डॉ.पंदेकृवि/प्रका./१५६१/२०२४

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**

# तुर पिकावरील किडी व रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन





श्री. राजेभाऊ चव्हाण
श्री. विशाल उबरहंडे
श्री. मनोज भोमटे
डॉ. विजयकुमार कोरे

**कृषि विज्ञान केंद्र**
हिवरा, पो.रतनारा, ता.जि.गोंदिया
फोन नं. (०७१८२) २८०१८०

# तुर पिकावरील किडी व रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन

तूर हे महाराष्ट्रातील प्रमुख कडधान्य पीक असून, महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात तुरीचे उत्पादन होते. मागील काही वर्षाचे संशोधनाद्वारे हळव्या तसेच गरव्या सुधारित वाणांचा विकास जास्त झालेला आहे. तूर पिकांचा विचार जर केला तर तुरीची उत्पादन घटण्या मागे तुर पिकावरील येणाऱ्या किडी, रोग व अवेळी पाऊस ही प्रमुख कारणे आहेत. या किडी व रोगाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे.

## तुरीवरील हेलिकोव्हरपाची अळी



शेंगा पोखरणारी अळी ही हेलिकोव्हरपा या नावाने सुद्धा ओळखली जाते. ही एक बहुभक्षी कीड असून एक अळी साधारणत: ७ ते १६शेंगांचे नुकसान करते. पूर्ण विकसित झालेली अळी ही पोपटी रंगाची असून शरीराच्या बाजूवर तुटक करड्या रेषा आढळतात.

### नुकसानीचे प्रकार :

अळी लहान असताना कळी फुलोऱ्यावर तर मोठी अळी मुख्यत: शेंगावर आक्रमण करते. ही अळी शेंगावर अनियमित आकाराचे छिद्र पाडून अर्धी आत तर अर्धी बाहेर राहून शेंगातील दाणे खात राहते.

### एकात्मिक कीड व्यवस्थापन :

**१. वनस्पतीजन्य कीटकनाशके :** या अळीच्या नियंत्रणासाठी सुरुवातीच्या काळात पाच टक्के निंबोळी अर्काची फवारणी फायदेशीर आढळून आलेली आहे.

**2. जैविक कीटकनाशके :** तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या हेलिकोव्हरपा अळीच्या प्रभावी व्यवस्थापनाकरिता एच.ए. एन.पी.व्ही.प्रति हेक्टर ५०० रोगग्रस्त अळ्यांचा अर्क (१x$१०^{९}$) तीव्रता फवारावा. विषाणूच्या फवाराची कार्यक्षमता अतिनील किरणात टिकवण्यासाठी अर्धा लिटर पाण्यामध्ये ५० ग्रॅम राणीपॉल टाकून हे द्रावण एक मिलिलिटर प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ही फवारणी शेतात प्रथम द्वितीय अवस्थेतील अळ्या असताना केल्यास प्रभावी ठरते.

**3. रासायनिक किटकनाशके :** तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या अळीचे व्यवस्थापनासाठी किडींनी आर्थिक नुकसानीची संकेत पातळी गाठल्यानंतर (दहा ते वीस अळ्या प्रति दहा झाडे) इमामेक्टीन बेंझोएट ५ एस.जी. ४.४ ग्राम किंवा क्लोरेंट्रीनेलीप्रोल १८.५ एस. सी. २.५ मिली प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. इथिऑन ५० ईसी १०-१५ मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २० मिली किंवा फ्लुबेंडामाईड २० डब्ल्यु. जी. ५ ग्रॅम किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ ईसी ७ मिली. शेंगा पोखरणाऱ्या अळयांसाठी केंद्रिय किटकनाशक मंडळाद्वारे शिफारशीत इंडोक्झाकार्ब १५.८ टक्के (७ मिली प्रति १० लिटर पाण्यात) वापरावे.

## तुरीवरील पिसारी पतंग

या किडीची अळी हिरवट रंगाची मध्यभागी फुगीर व दोन्ही टोकाकडे निमुळती होत गेलेली व पाठीवर काटेरी लव असलेली असते. कोष दिसायला अळीप्रमाणे पण तपकिरी रंगाचा असतो.

**नुकसान :** लहान अळी कळ्या, फुले व शेंगाना छिद्र पाडून दाणे खाते. ही अळी शेंगेच्या आत कधीच शिरत नाही.





मोठी अळी तुरीच्या शेंगावरील साल खरडुन शेंगाना छिद्र पाडून दाने खाते.

**रासायनिक कीटकनाशके:** पिसारी पतंगाच्या पाच ते दहा अळ्या प्रति दहा झाडे आढळून आल्यास मोनोक्रोटोफास ३६% प्रवाही ११ मिली किंवा कार्बारील १० % पाण्यात मिसळणारी पावडर ४० ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यात फवारणी करावी.

## तुरीच्या शेंगेवरील माशी

अळी पांढऱ्या रंगाची व गुळगुळीत असते. अळीला पाय नसतात व अळीच्या तोंडाकडील भाग निमुळता व टोकदार



असतो. शिंगाच्या बाहेर निरीक्षणावरून या अळीच्या प्रादुर्भावाची लक्षणे दिसून येत नाही. पूर्ण विकसित अळी कोषावस्थेत जाण्यापूर्वी बाहेर पडण्यासाठी शेंगेला छिद्र पाडते तेव्हा या अळीच्या नुकसानीचा प्रकार लक्षात येतो.